## फौजदारी चौकशी अर्ज क्र. १४४/२०१८ मधील निशाणी क्र. १४ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने सामनेवालेंविरुध्द महिलांचा घरगुती जुलमांपासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५ चे कलम ६, १८, १९, २०, २१, २२, २३ व ३१ अन्वये दाखल केलेला आहे.

२. **संक्षिप्तमध्ये अर्जातील मजकुर असा की –**

अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ हे पती पत्नी आहेत. सामनेवाला क्र. २ व ३ हे सामनेवाला क्र. १ चे जनक माता पिता असुन अर्जदार क्र. १ चे सासु–सासरे आहेत. तसेच सामनेवाला क्र. ४ हा सामनेवाला क्र. १ चा सख्खा भाऊ असुन अर्जदाराचा दिर आहे. सामनेवाला क्र. ५ ही सामनेवाला क्र. १ व ४ ची बहिण असुन अर्जदाराची नणंद आहे तसेच सामनेवाला क्र. ६ हा सामनेवाला क्र. ५ चे पती आहेत. अर्जदार व सामनेवाले हे एकाच कुटुंबात राहत होते.

३. अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह दि. ०९/०१/२०११ रोजी मौजे सात्रळ, ता. राहुरी, जि. अहमदनगर येथे अर्जदार क्र. १ हिचे वडीलांचे वस्तीवर ख्रिश्चन शास्त्र पध्दतीने संपन्न झालेला असुन आज रोजी त्यांचे दरम्यान विवाहसंबंध कायम आहेत. सदरील लग्नाचा संपुर्ण खर्च अर्जदाराचे वडील यांनी केला आहे. अर्जदाराचे वडीलांनी समानेवाला क्र. १, २ व ३ यांचे मागणीवरुन सामनेवाले क्र. १ यास ११ तोळे सोने हुंडा व रोख रक्कम रु. ५१,०००/– लग्न प्रसंगी भेट म्हणुन दिलेली आहे व साळंकृरित्या लग्न काढुन दिलेले आहे. लग्नानंतर अर्जदार ही सासरी सामनेवाले यांचे कुटुंबात नांदण्यासाठी गेली. सामनेवाले कुटुंबियात सामनेवाला क्र. १ सह त्यांचे आई–वडील, सामनेवाला क्र. ४ असे सर्व एकत्रात राहतात. सामनेवाला क्र. १ व सामनेवाला क्र. ४ हे नोकरीस असुन त्यांचे एकत्र कुटुंबाची एकत्रातील मौजे गोगलगांव येथे शेती असुन एकत्र कुटुंबाकरीता सामनेवाला क्र. २ व ३ हे शेतीचा व्यवसाय करतात. लग्नानंतर अर्जदार हिस सामनेवाले यांनी सुरुवातीला साधारण १ महिना चांगले नांदवले. त्यानंतर सामनेवाले क्र. ३ ही म्हणु लागली की, अर्जदाराच्या लग्नामध्ये तिचा व तिचे कुटुंबियांचा योग्य तो मानपान झाला नाही. म्हणुन त्या कारणावरुन ती अर्जदारास घालुन पाडुन बोलत असे. तसेच अर्जदार ही मौजे गोगलगांव येथे रहात असताना सामनेवाले तिचा मानसिक व शारिरीक छळ

करु लागले. अर्जदार क्र. १ त्यावेळेस मौजे कोल्हार येथे बँकेत नोकरीस होता. तो जावुन–येवुन नोकरी करीत होता. त्यावेळी सामनेवाले हे अर्जदार हिस मौजे गोगलगांव येथे दिवस–दिवस उपाशी ठेवुन शेतीची कष्टाची कामे करावयास लावत असे. संध्याकाळी सामनेवाला क्र. १ हा घरी आल्यानंतर समनेवाले क्र. २ व ३ हे त्यास अर्जदार क्र. १ विषयी खोटया–नाटया तक्रारी सांगत व त्या कारणावरुन सामनेवाले क्र. १ हा अर्जदारास बेदम मारहाण करीत असे. ती हा सर्व त्रास सहन करत असे.

४. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाले हे बाहेर गेल्यानंतर जर अर्जदारासोबत कोणी बोलले किंवा कोणी हात दाखवला तर सामनेवाला क्र. १ हिस 'काय गरज होती, तू काय माणुस आहे काय ? माणसासारखे हात वर करते, काय गरज होती' या कारणावरुन घरी आल्यानंतर अर्जदारास बेदम मारत असे व तिचा छळ करत असे. अशाप्रकारे सामनेवालेंचा शारिरीक व मानसिक छळ सुरु असताना अर्जदार ही छळास कंटाळुन तिने दि. ३१/०७/२०११ ला गटारी अमावस्येच्या दिवशी स्वतःला संपविण्याच्या उद्देशाने विष प्राशान केले. सामनेवाले यांनी तिस दवाखान्यात ॲडमिट केले व तिच्या माहेरच्यांना कळविले. अर्जदार हिस तिचे वडीलांनी त्यावेळी दवाखान्यात औषध उपचार केले व दवाखान्यातुन तिस घेवुन ते सात्रळ येथे गेले. त्यानंतर सुमारे दहा महिने अर्जदार क्र. १ ही माहेरी राहिली. त्या दरमयान सामनेवाले यांनी तिची विचारपुस केली नाही. त्यानंतर सामनेवाला यांचे मामा श्री. वाघमारे व काही अर्जदार व सामनेवाले यांचे नातेवाईकांनी मध्यस्थी करुन सामनेवाले यांनी अर्जदार हिस त्रास देणार नाही, तिला चांगले नांदवु असा नोटरी पब्लीक यांचे समोर बंधनामा लिहुन देवुन अर्जदार हिस नांदावयास घेवुन गेले. त्यानंतर काही काळ बरे गेले. त्यानंतर अर्जदार हिस सामनेवाले पासुन आकांक्षा नावाची मुलगी झाली. दरम्यान सामनेवालेची बदली कोल्हार वरुन नाशिकला झाली. तथापि अर्जदार हिस गोगलगाव येथेच ठेवुन आठवडयातुन एकदा सामनेवाला क्र. १ हा घरी येत असे. त्या दरम्यान अर्जदार ही गोगलगाव येथे रहात असताना सामनेवाले हे तिचे व तिचे मुलीचे खाण्याची हेळसांड करीत असे. मुलीस पिण्यासाठी दुध ही घेत नसे. घरी वाहने असताना अर्जदार हिस मुलीस पोलीओ ट्रिपलचे डोस देण्यासाठी तिला मुलीसह एकटीच पायी गोगलगांव येथे पाठवत असत, शेतात कष्टाची कामे करावयास लावत असत. हा सर्व त्रास सहन करत ती नेटाने संसार करण्याचा प्रयत्न करीत असत.

५. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवालेंचे कुटुंबियांवर सामनेवाले

क्र. ५ प्रतिभा व तिचा नवरा यांचा अत्यंत दबाव आहे. त्यांचे व सामनेवाले क्र. ६ यांचे कायम गोगलगांवी येणे–जाणे असे. ते आल्यानंतर सामनेवाले क्र. २ व ३ हे अर्जदाराने तिची सेवा करण्यासाठी नेहमीच त्रास देत असत व ती ही माहेरी आल्यानंतर अर्जदाराचा छळ करीत असत. त्यानंतर सामनेवालेची बदली नाशिक येथे असताना काही काळ अर्जदार या सामनेवाले क्र. ४ हे दिंडोरी येथे रहात. त्या घरात अर्जदार ही रहात होती. त्यावेळी सामनेवाले क्र. ४ रविंद्र माघाडे हे ही अर्जदार हिचा अत्यंत छळ करत होते. तिचे व तिचे मुलीचे खाणे–पिण्यावरुन आरडा–ओरडा करीत असता, तिस घालुन पाडुन बोलत असत. पुढे सामनेवाले याची बदली रोहा, जि. रायगड येथे झाली व त्यावेळी सामनेवाले क्र. १ यांनी अर्जदार हिस घेवुन तेथे लॅंड मार्क बिल्डींग भाटे वाचनालया समोर जागा भाडयाने घेवुन तेथे अर्जदार व सामनेवाले क्र. १ हे एकत्रात राहु लागले. तेथेही अर्जदार हिचा सामनेवाले क्र. १ हा मानसिक व शारिरीक छळ करत असे. तथापि, त्याकडे अर्जदार ही आपणास मुलगा होईल, संसार होईल या आशेने सामनेवालेचे त्रासाकडे दुर्लक्ष करुन नेटाने संसार करण्याचा प्रयत्न करीत होती. त्या दरम्यान ती गरोदर राहिली. गरोदर असताना रोहा गरोदर असताना रोहा येथील डॉक्टरांची ट्रिटमेंट घेतल्याने व डॉक्टरने सांगितल्यावरुन तेथेच डिलेव्हरी करण्याच्या ठरल्यावरुन अर्जदार हिची आई सामनेवालेचे घरी रोहा येथे रहात होती. त्यावेळेस ही सामनेवाला व त्याची आई ही अर्जदार व तिचे आईस नेहमीच घालुन पाडुन बोलत असे. अर्जदाराची डिलेव्हरी झाल्यानंतर तीस अर्जदार क्र. ३ व ४ ही जुळे मुलगा–मुलगी झाली. त्यानंतर अर्जदारांना तिचे आईंनी विश्रांतीसाठी सुमारे दिड महिना ठेवले व त्यानंतर त्यांना त्यांचे घरी मौजे गोगलगांव, ता. राहाता येथे नेवुन घातले. अर्जदार हे गोगलगांव येथे रहात असताना सामनेवाला क्र. १ हा जावुन–येवुन करत असे. त्यावेळीही सामनेवाले हे जाणुन बुजुन अर्जदारांचे खाण्या–पिण्याची आबाळ करीत असे.

६. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, माहे जुन २०१७ मध्ये सामनेवाले यांनी अर्जदार क्र. १ हिस बेदम मारहाण केली. तिचे कानावर थापड मारली व त्यांना माहेरी सात्रळ येथे हाकलुन दिले. अर्जदार हिचे वडीलांनी डॉक्टरांकडे अर्जदार क्र. १ हिस बेदम मारहाण केली. तिचे कानावर थापड मारली व त्यांना माहेरी सात्रळ येथे हाकलुन दिले. झालेल्या प्रकाराबद्दल पोलीस स्टेशनला फिर्याद नोंदविली. सामनेवाले विरुध्द पोलीसांनी राहाता कोर्टात फिर्याद ही दाखल केली आहे. सामनेवाले यांनी अर्जदारांचा छळ करुन तिचे दाग–दागिणे काढुन घेवुन त्यांना हाकलुन दिले. त्यामुळे, नाईलाजास्तव अर्जदार हे मौजे सात्रळ येथे वडीलांचे कडे मोठया अडचणीत राहुन दिवस काढत आहे. तिस मुलांचे संगोपन

करणे अत्यंत कठीण होवुन बसले आहे. अर्जदाराचे वडीलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक आहे. अर्जदार ही माहेरी रहात असताना सामनेवाले यांनी त्यांचे अन्नवस्त्राची, पालन पोषणाची राहण्याची कोणतीही सोय केलेली नाही. त्यांचा शारिरीक व मानसिक छळ करुन गुन्हा केला आहे. सामनेवाले यांची आर्थिक परिस्थिती एकदम चांगली आहे. सामनेवाले यांचेकडे एकत्रीत कुटुंबातील सुमारे ७ एकर बागायत शेती आहे. तसेच सामनेवालेचे व अर्जदाराचे नावे लोणी खुाा, ता. राहाता येथे मिळकत नं. ६४८/१ गट नं. ५३४/१ मध्ये १५० चौ.मी. बिगर शेती बखळ जागेत २२ x ५० या मापाची दुमजली सिमेंट स्लॅब एकुण २२०० चाफ. फुटाचे बांधकाम असलेली इमारत आहे. प्रत्येक व्यक्तीपाठीमागे सामनेवाल्यांच्या कुटुंबात २ वाहने आहेत. सामनेवाले यांचे राहणीमान अतिशय उच्च आहे. सामनेवाले हा कार्पोरेशन बँकेत मॅनेजर म्हणुन नोकरीस असुन त्यास दरमहा १,००,०००/– रुपयाचे आसपास पगार आहे. सामनेवाले यांचे शेती, नोकरी इत्यादी पासुन मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. २० ते २५ लाख रुपये आहे. अर्जदारांचे सामनेवालेच्या उच्च रहाणीमानाप्रमाणे पालन पोषण करण्याची त्यांना पोटगी देण्याची जबाबदारी आहे. प्रस्तुतचे अर्जाची गुण–दोषावर चौकशी होण्यास बराच कालावधी लागणार आहे. अर्जदारास स्वतःचे व अर्जदार क्र. २, ३ व ४ चे पालन पोषण करण्यासाठी काहीही उत्पन्नाचे साधन नाही. मुले लहान असल्याने ती कोणताही कामधंदा करु शकत नाही. म्हणुन अर्जदार क्र. १ ते ४ यांना प्रत्येकी ७,०००/– रुपये अंतरीम पोटगी मिळावी, म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

७. सामनेवाले यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये, अर्जदाराचा अर्ज व त्यातील मजकुर हा सामनेवाले यांना मान्य व कबुल नसुन सदरचा अर्ज हा कायदेशीर नाही, अर्जदार हिने स्वतःहुन सामनेवाले क्र. १ चा त्याग केला आहे, त्यामुळे अर्जदार हिस अशा प्रकारचा अर्ज करण्याचा हक्क नाही, अर्जदार ही प्रवरा मेडीकल ट्रस्ट मध्ये हॉस्पीटलमध्ये नर्सिंग चा जॉब करते, ती नोकरीस आहे, तिला वेगळी पोटगी देण्याची आवश्यकता नाही, अर्जदार हिने नामदार हायकोर्टाच्या सांगण्यानुसार शपथपत्र दाखल करताना अर्जदार ही नोकरी करते ही बाब लपवुन ठेवली आहे, सबब, सामनेवाले यांनी अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

८. अर्जदार व सामनेवाले यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. संचिकेचे अवलोकन केले. दाखल कागदपत्र व युक्तीवादावरुन खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यावर निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदवले, ते खालीलप्रमाणे –

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सामनेवाले यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे, हे प्रथमदर्शनी दिसुन येते काय ? | होय |
| २ | अर्जदार ही सामनेवालेकडुन अंतरिम आदेश मिळणेस पात्र आहे काय ? | होय |
| ३ | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |

## **का र ण मि मां सा**

**मुद्दा क्र. १ बाबत –**

**९.** अर्जदाराने सदर अर्जाच्या पुष्टर्थ तिचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी गैर–कृषि अवधारणांसाठी मालमत्ता आणि जबाबदा–या यांचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. १८ अन्वये दाखल केले आहे.

**१०.** सामनेवाले यांनी त्यांचे कथन शाबीत करण्यासाठी नि.क्र. २७ व नि.क्र. ३०, नि.क्र. ३३, नि.क्र. ३६ व नि.क्र. व नि.क्र.३८ सोबत दि. २३/०९/२०२२, २६/११/२०२२ व २८/०१/२०२३ व दि. १३/०४/२०२३, सन २०२३–२४ व दि. ०९/०८/२०२३ रोजी त्यांनी अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या शाळेच्या फिज भरल्याच्या पावत्या दाखल केलेल्या आहेत. सामनेवाल यांनी देखील गैर–कृषि अवधारणांसाठी मालमत्ता आणि जबाबदा–या यांचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. १७ अन्वये दाखल केले आहे.

**११.** अंतरिम पोटगीच्या अर्जाचा निर्णय घेताना प्रथमदर्शनी पुरावा पाहणे गरजेचे आहे. येथे असे नमुद करावेसे वाटते की, अर्जदाराने तिच्या कथनास शपथपत्राव्दारे पुष्टी दिली आहे.

**१२.** एकुणच अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदाराची सामनेवाला क्र. १ ते ४ यांच्याकडे नांदावयाची इच्छा असताना

सामनेवाला क्र. १ ते ४ हे तिला नांदावयास नेत नाहीत. भारतीय संस्कृतीनुसार पतीने पत्नीच्या व त्यांच्या मुलांच्या अन्नवस्त्राची सोय करणे आवश्यक आहे. तसेच पत्नीला व मुलांना सांभाळण्याची पतीची नैतिक जबाबदारी आहे. अर्जदाराने सादर केलेला एकंदर पुरावा पाहता सामनेवाला याने अर्जदार क्र. १ ते ४ यांची काळजी घेण्याचे टाळल्याचे दिसुन येते. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराच्या बाजुने प्रथम दर्शनी असल्याचे दिसुन येते. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर **होकारार्थी** देत आहे.

**मुद्दे क्र. २ व ३ बाबत –**

**१३.** अर्जदार ही सध्या तिच्या मुलांसोबत माहेरी रहात आहे. सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिचा पती आहे. सबब, सामनेवाला क्र. १ याची अर्जदार हिस सांभाळण्याची जबाबदारी आहे. परंतु, वर नमुद केलेल्या एकंदरीत चर्चेवरुन असे दिसुन येते की, सामनेवाला क्र. १ हा अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या शैक्षणिक खर्चाव्यितिरीक्त त्यांची इतर जबाबदारी पार पाडत नाही. तसेच, अर्जदार क्र. १ यांचीही जबाबदारी सामनेवाला क्र. १ पार पाडत नसल्याचे दिसुन येते. अर्जदार क्र. १ ही तिच्या मुलांसह ब–याच दिवसांपासुन तिच्या माहेरी राहत आहे व अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन असल्याचे दिसुन येत नाही. परंतु, न कमवित्या पत्नीची व मुलांची अन्न वस्त्र निवा–याची सोय करणे बंधनकारक असुन ती सामनेवाला क्र. १ हा पार पाडण्यास समर्थ असल्याचे अर्जदाराने कथन केले आहे. अर्जदाराच्या सांगण्याप्रमाणे सामनेवाला क्र. १ हा प्रतिमहा १ लाख रुपये कमवितो. परंतु, त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा तिने अभिलेखावर दाखल केलेला नाही. सामनेवाला क्र. १ याने त्याच्या गैर–कृषि अवधारणांसाठी मालमत्ता आणि जबाबदा–या यांचे प्रतिज्ञापत्रात त्याला मासिक रुपये ६४,२३२/– एवढी रक्कम मिळत असल्याचे नमुद केले आहे. यावरुन सामनेवाला क्र. १ यास प्रतिमहा रुपये ६४,२३२/– एवढी रक्कम मिळत असल्याचे दिसुन येते. सबब, सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिस तिच्या दैनंदिन खर्चासाठी व औषधोपचारासाठी ३,०००/– रुपये प्रतिमहा देणे न्यायोचित राहील. अर्जदार क्र. २ ते ४ हे शाळेत शिक्षण घेत असल्याचे दिसुन येते. तसेच, सामनेवाला क्र. १ हा त्यांच्या शाळेच्या शिक्षणाची फी भरत असल्याचे दिसुन येत आहे. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या शाळेचा, शाळेत जाण्या–या वाहतुकीचा खर्च करावा. तसेच, त्याव्यतिरीक्त सामनेवाला याने अर्जदार क्र. २ ते ४ यांच्या दैनंदिन खर्चासाठी व औषधोपचारासाठी प्रत्येकी रक्कम रुपये ३,०००/– प्रत्येक महिन्याला देणे न्यायोचित राहिल. सदरची ३,०००/– रुपये ही त्यांच्या शालेय

शिक्षणाच्या खर्चाच्या व्यतिरीक्त राहिल. सबब, मुद्दा क्र. २ चे निष्कर्ष मी **होकारार्थी** नोंदवित आहे व मुद्दा क्र. ३ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |
| २ | सामनेवाले क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिस दरमहा अंतरीम पोटगी रक्कम रुपये ३,०००/– (रुपये तीन हजार फक्त) प्रमाणे व अर्जदार क्र. २ ते ४ यांना दरमहा अंतरीम पोटगी प्रत्येकी रक्कम रुपये ३,०००/– (रुपये तीन हजार फक्त) सदरचा अर्ज दाखल तारखेपासुन प्रकरणाचा अंतिम निकाल होईपर्यत देण्यात यावी. सदरची अर्जदार क्र. २ ते ४ यांची अंतरीम पोटगीची रक्कम त्यांच्या शैक्षणिक खर्चाव्यतिरीक्त राहील. सामनेवाला क्र. १ याने वर नमुद पोटगी रक्कमेच्या व्यतिरीक्त अर्जदार क्र. २ ते ४ यांचा शैक्षणिक खर्च करावा. |

दि. १२/०१/२०२४

**(सौ. आर. एस. तापडीया)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र, २, राहुरी.